

# संस्कार प्रशिक्षण

माणूस हा देखील एक प्राणी आहे, मात्र इतर प्राण्यांपेक्षा तो वेगळा आहे. त्याचं हे वेगळेपण त्याच्या जगण्यात आहे, जगण्याच्या शैलीत आहे. अन्य सर्व प्राणी नैसर्गिक जीवन जगतात, म्हणजे काही प्राणी इतर प्राण्यांची शिकार करतात, ते त्याचं अन्न असतं. काही प्राणी गवत खातात, झाडांचा पाला खातात, काही प्राणी-पक्षी झाडावर राहतात, काही बिळात राहतात, काही नैसर्गिक आडोसा शोधतात. माणूस सोडून सर्वच प्राणी दिगंबर अवस्थेत राहतात. त्यांच्या रक्षणासाठी शरीर झाकणं ते जाणत नाहीत. माणूस या निसर्गातच राहतो, पण आपल्या जगण्यास अनुकूल असे बदल त्याने घडवले आहेत. मांसाहार असो की शाकाहार अन्न शिजवून खाण्याची कला त्याने साध्य केली आहे. त्याने स्वतःसाठी घर, गावं, शहरं वसवली आहेत. स्वतःच्या प्रवासासाठी बैलगाडीपासून विमानांपर्यंत साधनं त्याने विकसित केली आहेत. लज्जारक्षणासाठी त्याने वस्त्रं निर्माण केली आहेत, म्हणजेच आपल्या जगण्यावर त्याने संस्कार केले आहेत. माणूस हा एक संस्कारित प्राणी आहे.

हा झाला संस्काराचा एक प्रकार. त्याला भौतिक बदल किंवा संस्कार म्हणता येईल, पण माणसाच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवणारा संस्कार आणखी वेगळा आहे. तो आहे, आत्मिक संस्कार किंवा आध्यात्मिक संस्कार. या संस्कारांमुळेच माणूस हा 'माणूस' बनला आहे. संस्कारांनीच माणसातला माणूस घडवलेला आहे.

माणसाला काल-आज-उद्याचं भान आहे. भूत-वर्तमान आणि भविष्य हे कालभान त्याच्याकडे आहे. हे कालभान म्हणजे 'आत्म जाणीव' होय. कालची पिढी आजच्या पिढीला संस्कार देते. आजची पिढी उद्याच्या पिढीला संस्कार देते. ही परंपरा या आत्मजाणीवेतून आकाराला आली आहे, आणि तिच्यात सातत्य आहे.

माणूस ज्यावेळी जन्माला येतो तेव्हा तो खाणीतून काढलेला एक पाषाण असतो. या पाषाणात एखादा हिरा असेल किंवा एखादा संगमरवर असेल. या पाषाणाचा उपयोग समाजाच्या जडणघडणीत होण्यासाठी त्यावर प्रक्रिया करावी लागते. समाजाला उपयुक्त असं मटेरिअल तयार करणं आवश्यक असतं. हिऱ्याला पैलू पाडले की, तो आकर्षक, चमकदार होतो, समाजाचं भूषण ठरतो. पाषाणावर किंवा संगमरवर उदात्त चित्रं कोरली किंवा सुवचनं कोरली तर तो पवित्र ठरतो त्याच्यावर चुकीचा संदेश कोरून समाजाला चुकीचा रस्ता दाखवला, समाजात तेढ निर्माण केली तर तो समाजाकरता हानीकारक ठरतो. थोडक्यात, या पाषाणावर जसे संस्कार कराल तसा आकार त्याच्या चरित्राला येतो. अर्थात, जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलात काही उपजत गुण असतातच. त्याच्यात 'हिरा' बनण्याचे, 'संगमरवर' बनण्याचे किंवा साधारण पाषाणच राहण्याचे उपजत गुण असू शकतात. त्याला आपण त्याचं 'जेनेटीक मटेरिअल' किंवा त्याचं सत्त्व म्हणू शकतो. त्याच्या या 'जेनेटीक मटेरिअल' किंवा सत्त्वांचा उपयोग समाजाच्या जडणघडणीत होणं, म्हणजे संस्कार प्रशिक्षण! संस्कारांमधून व्यक्तीला समाजाकरिता उपयुक्त बनवता येऊ शकतं.

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वसाधारणपणे तीन प्रकारे वर्गवारी करता येईल. एक म्हणजे सात्त्विक व्यक्तिमत्त्व, दुसरं म्हणजे राजस व्यक्तिमत्त्व आणि तिसरं म्हणजे तामस व्यक्तिमत्त्व. या तीन प्रकारांपैकी कोणत्या स्वरूपाचं व्यक्तिमत्त्व समाजाकरिता अधिक उपयुक्त, अधिक पूरक आणि समाजाची गुणवत्ता वाढवणारं असतं, हे आपण सारेच जाणतो. या संदर्भात महाभारतातील तीन व्यक्तिरेखा या उत्तम उदाहरणं आहेत. एक म्हणजे योगेश्वर कृष्ण, दुसरे पितामह भीष्म, तिसरा दानशूर कर्ण. या तीनही व्यक्तिमत्त्वांच्या जडणघडणीत अनेक समान धागे आहेत, तिघांचही कर्तृत्व प्रभावी आहे. महाभारत युद्धात या तिघांचीही कामगिरी असामान्य ठरली आहे. कृष्णाचा जन्म कंसाच्या कारागृहात झाला. तो देवकीचा आठवा पुत्र... तिच्या पोटी जन्मला पण गोकुळात यशोदेचा पुत्र म्हणून वाढला. नंदाच्या घरी जन्माला आलेल्या कन्येला देवकीचं अपत्य मानून कंसाने तिचा जीव घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती कंसाच्या

हातून निसटली आणि तिने कंसाला संदेश दिला, 'तुझा कर्दनकाळ गोकुळात वाढत आहे' पितामह भीष्म हे गंगेचे पुत्र. शंतनु त्यांचे पिता. ते सुद्धा जन्माने आठवेच. त्यांची आधीची सात भावंडं गंगेत सोडून दिली होती. परशुराम हे त्यांचे गुरू. भीष्म महापराक्रमी होते. कुरू वंशाच्या रक्षणाची आणि त्यांचं सामर्थ्य कायम राखण्याची शिरावर घेतलेली जबाबदारी त्यांनी अखेरपर्यंत सांभाळली. कर्ण हा कुंतीचा पुत्र. कुंती कुमारिका असताना सूर्यापासून तिला झालेला. कुंतीला एक वरदान प्राप्त झालं होतं. या वरदानाच्या आधारे तिने सूर्याची आराधना केली आणि तिला पुत्रप्राप्ती झाली. त्यावेळी तिला ती कुमारिका असल्याचं भान आलं, तिला तिची चूक उमगली आणि या आपल्या पहिल्या अपत्याला तिने नदीत सोडून दिलं. सूर्याच्या आशिर्वादाने त्याला जन्मजात कवच कुंडलं प्राप्त होती. एका सारथ्याने त्याचं संगोपन केलं. सूर्यपुत्र असूनही तो सूतपुत्र म्हणून हिणवला गेला. त्याला पदोपदी अपमान सहन करावा लागला. कृष्णालाही लहानपणी 'गवळ्याचं पोर' म्हणून हिणवलं गेल. तो गोकुळात वाढत असताना त्याच्यावर वेगवेगळ्या प्रकारे प्राणघातक हल्ले झाले. हे सारं आपल्याला माहीत आहेच. थोडक्यात, या तिघांना जन्मापासून विपरित परिस्थितीला तोंड द्यावं लागलं, अन्याय सहन करावे लागले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांच्या लहानपणीच्या परिस्थितीचा, त्यांना सामोऱ्या जाव्या लागलेल्या प्रसंगांचा निश्चितच वाटा आहे. त्यांच्या जीवनातील पुढच्या वाटचालीत आपल्याला त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू दिसून येतात. कृष्ण पराक्रमी होता. जुलमी कंसाशी संघर्ष करून त्याने कंसाचं राज्य जिंकलं आणि महाराज उग्रसेनांना पुन्हा गादीवर बसवलं. कंसाने महाराज उग्रसेनांना बंदी बनवून त्यांचं राज्य बळकावलं होतं. कृष्णाने ते त्यांना परत केलं. कृष्णाने भीमाकरवी जरासंधाचा वध घडवून त्याची जुलमी सत्ता संपुष्टात आणली. नरकासुराचा वध करून त्याच्या अत्याचाराने त्रस्त झालेल्या सोळा सहस्र नारींची त्याने मुक्तता केली. जुलमांचा नाश करून न्यायाची स्थापना करण्याचे महान कार्य कृष्णाने केलं. त्याने अनेक जुलमी सत्ताधीशांचा नाश केला, पण त्यांची जिंकलेली राज्यं स्वतःकडे न ठेवता त्याने योग्य व सत्पात्री व्यक्तींकडे सोपवली. मानवी इतिहासात असं उदाहरण दुर्मिळ होय.

पितामह भीष्मांनी सुद्धा योग्यता व सामर्थ्य असूनही राजसत्तेला कधी स्पर्श केला नाही. पिता शंतनु एका धीवर कन्येच्या प्रेमात पडले होते. त्यांच्या इच्छेखातर भीष्मांनी सिंहासनाची इच्छा कधीही न धरण्याची आणि आजन्म ब्रह्मचारी राहण्याची

प्रतिज्ञा केली होती. या प्रतिज्ञेचा शेवटच्या श्वासापर्यंत त्यांनी भंग केला नाही. त्यामुळेच दिलेल्या वचनाच्या, केलेल्या कठोर प्रतिज्ञेच्या कठोर पालनाला 'भीष्मप्रतिज्ञा' म्हटलं जातं! पितामह भीष्म अखेरपर्यंत कुरुवंशाचे विश्वस्त म्हणून कटिबद्ध राहिले. कर्णदेखील बलवान होता. पराक्रमी होता. स्वतःच्या कर्तृत्वाने आणि दुर्योधनाच्या मैत्रीने तो अंगदेशाचा राजा झाला. कर्ण दानशूर होता. त्याला माहीत होतं की, त्याच्याकडे कवच कुंडलांची मागणी करणारा याचक हा रूप पालटलेला इंद्र आहे. अर्जुन हा इंद्राचा पुत्र. अर्जुनाच्या हितासाठी इंद्र आपली कवच कुंडलं कपटाने काढून घेत आहे, हे जाणूनही त्याने आपली कवच कुंडलं काढून दिली, एकाप्रकारे आपलं सर्वस्व दान केलं. या दानशूरतेला तोड नाही.

ही तीनही व्यक्तिमत्त्वं त्यांच्या या गुणांमुळे आदर्श ठरतात. पराक्रम हा तिघांमध्ये समान गुण होता. न्यायीपणा हा कृष्णाचा उपजत गुण होता, ते त्याचं सत्त्व होतं. 'जेनेटीक मटेरिअल' होतं, वचनबद्धता हा भीष्मांचा उपजत गुण होता. तर दानशूरपणा हा कर्णाचा उपजत गुण होता. ते त्याचं सत्त्व होतं. 'जेनेटीक मटेरिअल' होतं. हे त्यांचे महान गुण होते. या गुणांमुळे ते 'युगपुरुष' ठरले, यात शंकाच नाही. पण त्यांच्या या गुणांचा समाजाच्या दृष्टीने काय परिणाम झाला, समाजाकरिता या गुणांचा त्यांनी कसा वापर केला हे पाहणं इष्ट ठरेल. दुसऱ्या शब्दात सांगायचं, तर त्यांचे हे उपजत गुण त्यांच्या आयुष्यात कसे संस्कारित झाले आणि समाजात त्यांची भूमिका काय राहिली याचा विचार आपण करतो तेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे भिन्न स्तर आपल्या समोर येतात.

कृष्णाने जन्मापासून अन्यायाचा प्रतिकार केला. महाराज उग्रसेनांचं न्याय्य राज्य बळकावून जुलूम जबरदस्ती करणारा कंस असेल, किंवा अबला स्त्रियांना बंदी बनवणारा नरकासूर असेल. त्यांच्या विरोधात तो उभा ठाकला. शिशुपालाला वारंवार इशारे देऊन सुधारण्याची संधी त्याने दिली. पण त्याचे शंभर अपराध पूर्ण झाल्यावर त्याचा वध केला. सुईच्या टोकावर मावेल एवढी देखील भूमी पांडवांना देणार नाही अशी कर्मठ भूमिका घेणाऱ्या दुर्योधनाच्या विरोधात तो पांडवांच्या बाजूने उभा राहिला. समस्त कौरवसभा द्रौपदीचं वस्त्रहरण अगतिकपणे पहात असताना तिच्या लज्जारक्षणासाठी तो धावला, त्याने द्रौपदीला वस्त्रं पुरवली. 'महाभारत' टाळण्यासाठी त्याने शिष्टाई केली. पण दुर्योधनाच्या अहंकारामुळे अखेर त्याला या महायुद्धाला होकार द्यावा लागला. या महायुद्धात शस्त्र हाती न धरण्याची प्रतिज्ञा त्याने केली पण

निर्माण झालेल्या परिस्थितीत शस्त्रं धारण करण्यास त्याने मागे पाहिलं नाही. न्यायासाठी प्रसंगी त्याने डावपेचही खेळले, पण त्याचं अंतिम उद्दिष्ट मानव कल्याण हेच होतं. त्याने सोन्याची द्वारका वसवली, यादवांचा उत्कर्ष पाहिला आणि त्यांच्यातील त्यांनाच संपवणारी 'यादवी' ही त्याने पाहिली. अखेर कोणताही दिमाख न दाखवता, गाजावाजा न करता एका दाट वनात त्याने आत्मत्याग केला. जीवनाचे सगळे रस उपभोगूनही त्याचं जगणं एका योग्यासारखं होतं, उदात्त होतं, सत्त्वशील होतं, म्हणूनच तो योगेश्वर ठरला. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील सात्त्विक गुणाचा अनुभव त्याने सातत्याने समाजाला दिला. तो संपूर्ण आयुष्य निरपेक्षपणे जगला, म्हणूनच आजही लाखो वारकरी त्याच निरपेक्ष वृत्तीने पंढरीची वारी करतात. विठ्ठलाच्या रुपातल्या कृष्णाला भजतात.

वचनाचं पालन करणं हा पितामह भीष्मांचा महान गुण होता पण कर्तव्य आणि वचन यांची सांगडही जीवनात महत्त्वाची असते. पितामह भीष्म एका अर्थाने कुरुवंशाचे पालनहार होते, पालक होते. पालक या नात्याने कर्तव्य बजावण्याची वेळ आल्यानंतरही त्यांनी त्यांच्या प्रतिज्ञेवर-दिलेल्या वचनावर अटळ राहणं पसंत केलं. इथे एका अर्थाने त्यांची प्रतिज्ञा हा त्यांचा हट्ट बनला. त्यामुळे ज्या गोष्टी ते वेळेवर रोखू शकले असते. त्या त्यांनी रोखल्या नाहीत. परिणामी महाभारत अटळ ठरलं. कौरवांबरोबर द्युत खेळताना त्यांनी पांडवांना रोखलं नाही आणि द्रौपदीचं वस्त्रहरण करणाऱ्या दुःशासन-दुर्योधनालाही त्यांनी रोखलं नाही. राजसिंहासनाकडून अन्याय होत असतानाही राजनिष्ठेपोटी त्यांनी मौन राखणं पसंत केलं. त्यांनी स्वतःच स्वतःवर हतबलता लादून घेतली. पांडवांवर त्यांचं प्रेम होतं, त्यांच्या सदिच्छा होत्या, पण पांडवांवरील अन्याय ते रोखू शकले नाहीत. राजसत्तेशी असलेली निष्ठा जपण्यासाठी ते महाभारत युद्धात पांडवांच्या विरोधात कौरवांच्या बाजूने उतरले. त्यांची ही कर्तव्यकठोरता हे राजस व्यक्तिमत्त्वाचं लक्षण आहे. त्यांच्या उपजत गुणांचा विकास अशा तऱ्हेने राजस व्यक्तिमत्त्वाकडे झाला. आपली कर्तव्यकठोरता जपताना तसंच आपल्या वचनांचं पालन करताना ते स्वतःभोवती एक कोश विणत राहीले व त्यातच ते बद्ध झाले.

कर्ण दानशूर होता. स्वतःची कवच कुंडलं काढून देण्यासही त्याने मागेपुढे पाहिलं नाही. हे जरी खरं असलं तरी त्याच्यावर लादण्यात आलेलं अनौरसपण, वाट्याला आलेले अपमान विसरणं त्याला सहज शक्य झालं नाही. या अपमानाच्या धगीत तो होरपळत राहिला आणि त्याने दुर्योधनाच्या अयोग्य वर्तनाला साथ दिली.

त्याला उपजत आत्मसौंदर्य लाभलं होतं, पण नाकारले गेल्याची भावना सतत मनात ठसठसत राहिल्याने त्याचं आत्मसौंदर्य क्षीण होऊन त्याची जागा सुडाच्या काजळीने घेतली. द्रौपदीची त्याने मानहानी केली, तिचा उपमर्द केला. तिचं वस्त्रहरण होत असताना त्याने कौरवांना प्रोत्साहन दिलं. दुर्योधनाने द्रौपदीला मांडी दाखवली तेव्हा त्याने त्याला रोखलं नाही. दुःशासनाने द्रौपदीची वस्त्र फेडण्यास सुरुवात केली, तरी त्याने त्याला रोखलं नाही. यादृष्टीने कर्णाचं व्यक्तिमत्त्व तामसी ठरतं. या महापराक्रमी योद्ध्याच्या रथाचं चाक जमिनीत रुतलं आणि कृष्णाने ही संधी साधून अर्जुनाला कर्णावर बाण सोडण्याची सूचना केली. रणांगणावर विद्ध झालेल्या कर्णाने कृष्णाला या अधर्माबद्दल विचारलं, तेव्हा कर्णाच्या कृत्यांचा पाढा वाचून कृष्णाने विचारलं, 'कर्णा, तेव्हा कुठे गेला होता तुझा धर्म?'

धर्म म्हणजे सद्वर्तन. तुमच्यात उपजत चांगले गुण असतील पण तुम्ही सद्वर्तनी असाल तरच त्या गुणांची शोभा वाढेल. संस्कारातून सद्वर्तनाचं प्रशिक्षण मिळतं. महाभारतातील या तीन व्यक्तिरेखा सद्वर्तनाच्या, राजसवर्तनाच्या व तामसवर्तनाच्या प्रतीक आहेत. श्रीकृष्णाच्या चरित्रातून सात्विकतेची शिकवण मिळते, पितामह भीष्मांच्या चरित्रातून राजस व्यक्तिमत्त्वाच्या मर्यादा स्पष्ट होतात तर दानशूर कर्णाच्या चरित्रातून स्वतःवरील अन्याय विसरता न आल्याने कुसंगतीच्या प्रभावाने येणाऱ्या तामसीपणाचं आणि त्यातून होणाऱ्या अधःपतनाचं दर्शन घडतं. आपल्याला जीवनात योग्य मार्गाची दिशा या व्यक्तिरेखामधून मिळते. आजच्या काळात समाजाला दिशा द्यायची असेल, तर समाजावर काय संस्कार होत आहेत याचा परामर्श घेतला पाहिजे.

माणूस जन्माला येतो तेव्हा त्याच्याजवळ त्याचं सत्त्वं असतं, त्याचा आत्मा असतो, त्याची गुणसूत्रं असतात. जन्माला आल्यानंतर मरेपर्यंत तो जगण्याचे अनुभव घेत राहतो. हे अनुभव चांगले-वाईट असे सर्वप्रकारचे असतात. अनेक प्रसंगातून माणूस जातो. त्यात काही सुखाचे असतात, काही दुःखाचे असतात, काही गौरवाचे असतात काही मानहानीचे असतात. अशा साऱ्या प्रसंगातून व अनुभवांतून आपण जीवनाचा बोध घेतला पाहिजे. एखाद्या गोष्टीमध्ये आपण किती गुंतायचं, एखाद्या झालेल्या अपमानाबद्दल आपण किती कुढत रहायचं, एखाद्या गोष्टीच्या मागे किती धावायचं हे ठरवता आलं पाहिजे. त्यासाठी संस्कार आवश्यक असतात. स्वतःला भावना-विकाराच्या मागे जाऊ न देण्याचे संस्कार म्हणजे आध्यात्मिक संस्कार. अशा संस्कारांची आजच्या काळात खूप गरज आहे.



अध्यात्म हे नितीज्ञान आहे. नीतीने वागणं म्हणजे नैतिकता, ती आध्यात्मिक संस्कारातून आत्मसात करता येते. माझ्या व्यक्तिगत अनुभवावरून मला असं सांगावसं वाटतं, की तुम्ही दररोज थोडं का होईना पण चांगलं वाचलं पाहिजे, चांगलं ऐकलं पाहिजे, त्यावर चिंतन केलं पाहिजे, मनन केलं पाहिजे. संत मंडळींच्या सहवासात सत्संग केला पाहिजे. अशा वाचन-चिंतन-मननातून आणि सत्संगातून संस्कार घडतात. परिस्थिती कशीही असो, प्रतिकूल किंवा अनुकूल, आपण संस्कार प्रशिक्षणावर भर दिला पाहिजे आणि स्वतःला बजावलं पाहिजे, 'बाबा रे, तू जितकं विवेकीपणानं वागशील, तितकं तुझं जीवन सफल होईल.' एक चांगला समाज घडवताना, चांगल्या समाजाचं बांधकाम करताना त्या बांधकामातील एक सुशोभित शिल्पमणी बनण्यासाठी प्रत्येकाला संस्कारांचा मार्ग स्वीकारणं अनिवार्य आहे. किड्या-मुंग्याप्रमाणे जन्माला येणं आणि तसंच मरणं याला जीवन म्हणत नाहीत. जीवनाची सार्थकता कशात आहे? अनंत काणेकर यांनी एका लघुनिबंधात म्हटलं आहे, 'स्वतःसाठी जगलास तर मेलास, दुसऱ्यांसाठी जगलास तरच जगलास ...' आपण स्वतःसाठी किती जगतो आणि समाजासाठी किती विचार करतो याबाबतीत प्रत्येकाने स्वतःच स्वतःला तपासून पहावं. त्याग हा एक आदर्श गुण आहे, आणि तो विकसित करता येतो. त्यागातच खरी शांती आहे, या शांतीचा उपयोग आपल्या आयुष्यात नक्कीच होऊ शकतो.

'कर्मण्येवाधिकारस्ये मा फलेषु कदाचन!' हे गीतेतील वचन आहे. फलाची अपेक्षा न करता कर्म करण्याचा कर्मयोग योगेश्वर कृष्णाने सांगितला आहे. मात्र, आपण कर्म करताना नेहमी फलाचीच चिंता करतो. कर्म ठरवण्याच्या आधीसुद्धा आपल्या मनात फलाचा विचार असतो, कर्म ठरवल्यानंतरही फलाचाच विचार आपण करतो. त्या फलाचं आकारमान, वस्तुमान काय असेल हा विचार आपल्या मनात असतो. कर्म करत असतानाही हा विचार आपल्या मनातून हटत नाही. कर्म केल्यानंतर फळ अजून का मिळालं नाही, याचा विचार आपण करतो आणि फळ मिळाल्यानंतर त्याचा उपभोग कसा घ्यायचा हा विचार आपल्या मनात असतो. कधी अपेक्षित फळ

मिळालं नाही याचं दुःख असतं तर कधी योग्य प्रमाणात फळ मिळालं नसल्याची खंत असते. कधी इतरांना मिळालेल्या फळाचा हेवा वाटतो तर कधी दुसऱ्यांपेक्षा जास्त फळ मिळवण्याची ईर्षा निर्माण होते. आपल्याला मिळालेल्या फळाचा आपण उपभोग घेऊ शकत नसलो तर त्याचंही दुःख वाटत रहातं. ते फळ दुसऱ्याला अर्पण करायची मानसिक तयारीही होत नाही. थोडक्यात, फळांच्या विचाराशिवाय आपण कधी दूरच राहू शकत नाही. आपल्यालाच ठरवावं लागेल की आपल्याला जीवन योगेश्वर कृष्णाप्रमाणे जगायचं आहे, पितामह भीष्माप्रमाणे जगायचं आहे की, दानशूर कर्णाप्रमाणे... प्रत्येकाने स्वतःतील गुणांच्यानुसार समाजासाठी स्वतःची उपयुक्तता तपासून पाहिली पाहिजे. समाजाच्या हितासाठी आपले वैयक्तिक अहंकार बाजूला ठेवावे लागतील. हे संस्कार प्रशिक्षणातून घडू शकतं. व्यापक समाज हिताचा विचार जेव्हा घराघरातून होऊ लागेल आणि देशाच्याही पलीकडे साऱ्या जगाच्या भल्याचा त्यात समावेश असेल, तेव्हा खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची, आधुनिक समाजाची, आधुनिक जगाची संकल्पना साकार होईल.

आज 'पुराणातील वांगी पुराणात' असा लोकांचा दृष्टिकोन आढळतो. या सगळ्या जुनाट कल्पना आहेत असं मानून देव खरंच आहे का? पुनर्जन्म खरोखरच असतो का? महाभारत खरंच घडून गेलं आहे का? राम खरोखरच अस्तित्वात होता का? असे प्रश्न विचारले जातात. माझं असं मत आहे की, या बाबी शुल्लक आहेत. हा एक विचार आहे. आजच्या काळानुरूप या विचारांचं रूपातंर कसं करता येईल ज्यायोगे ते समाजाच्या उपयोगी कसे पडतील असे प्रश्न आपण विचारले पाहिजेत. कर्णावर अन्याय झाला म्हणून कर्ण असं वागला अशाप्रकारे कर्णाच्या वर्तनाचं समर्थन आजच्या काळातील अतिरेकी वर्तनाला लागू करायचं हे अतिशय घातक ठरू शकतं. त्याऐवजी मन मोठं करून दधिची ऋषींप्रमाणे समाजाच्या हिताकरिता स्वतःची हाडंसुद्धा समर्पित करण्याचा विचार करता आला पाहिजे. हा विचार संस्कारांमधून मिळतो. यासाठी संस्काराचं प्रशिक्षण देणारी केंद्र ठिकठिकाणी तयार केली पाहिजेत. वेगवेगळ्या धर्मांच्या त्यातील शिकवणीचा अभ्यास केला पाहिजे. समाजात चांगलं काम करणारे अनेक लोक आहेत. त्यांना प्रसिद्धी दिली पाहिजे. त्यांच्या चांगल्या कामाचा गौरव केला पाहिजे आणि जे अयोग्य वर्तन करतात, समाजाला घातक कामं करतात, त्यांना त्यांची जागा दाखवून दिली पाहिजे. निदान त्यांचं अनुकरण तरी करू नये. संस्कार प्रशिक्षण केंद्र अशा प्रकारचं दिशा मार्गदर्शन करू शकतील. एखाद्या गोष्टीच्या मागे



धावायचं आणि शेवटी हिरमोड पदरी पाडून घ्यायचा यापेक्षा त्या गोष्टीची समाजाला खरंच गरज आहे का? त्यातून समाजाचा उत्कर्ष साधणार आहे का? हे तपासलं पाहिजे.

'संस्कार' ही सतत घडणारी गोष्ट आहे. मनुष्य जन्माला आल्यानंतर नाम-संस्कारापासून त्याच्यावरील संस्कारांना सुरुवात होते. मनुष्याच्या मृत्यूनंतरही त्याच्यावर अंत्यसंस्कार केले जातात. या संस्कारांना काही अर्थ आहे. मात्र आजच्या काळात याला 'फॅड' म्हटलं जातं. पण हे योग्य नाही. माणूस जन्माला आल्यावर अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांसाठी झगडत राहतो. या गरजा पूर्ण झाल्यानंतर तो ऐशोरामी जगण्यासाठी झगडतो. गाडी हवी, बंगला हवा, एक गाडी मिळाली तर दुसरी हवी, एक बंगला झाला, आणखी एक हवा... या गरजा कधीच संपत नाहीत. त्याबरोबर माणूस प्रतिष्ठा मिळवायच्या मागे लागतो आणि शेवटी जेव्हा माणूस मृत्यूशय्येवर पडतो तेव्हा जीवनात आपण काय मिळवलं, हा विचार त्याच्या मनात येतो. पण त्यावेळी वेळ निघून गेलेली असते. 'मी कोण आहे' असं आत्मचिंतन तो करू लागतो. तेव्हा आपण जमा केलेला हा पसारा व्यर्थ असल्याची जाणीव त्याला होते; पण आता सुधारण्याची संधी निसटलेली असते. प्रश्न हा आहे की, असं आत्मचिंतन आपण मृत्यूशय्येवरच करणार आहोत का? उमेदीच्या काळात जर हे आत्मचिंतन करता आलं, त्यातून चांगल्या पद्धतीनं जीवनाला आधार उभा करता आला तर त्याची उपयुक्तता कालातीत ठरू शकते.